रिझर्व बँक ऑफ इंडिया
----------------------**RESERVE BANK OF INDIA** --------------------
**www.rbi.org.in**

आरबीआय/१३-१४/१९
युबीडी.बीपीडी.(पीसीबी) एमसी क्र.४/०९.२७.०००/२०१३-१४ जुलै १, २०१३

सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांचे
मुख्य कार्यकारी अधिकारी

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - हमी सहस्वीकार आणि पतपत्रे - युसीबीज्**

कृपया वर दिलेल्या विषयावरील महापरिपत्रकात युबीडी.बीपीडी (पीसीबी) एमसी. क्र. ४ /०९.२७.०००/ २०१२-१३ दि. जुलै २, २०१२ (रिझर्व बँकेच्या वेबसाईट http://www.rbi.org.in वर देण्यात आले आहे). ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेली आणि अद्यावत केलेली या विषयावरील जून ३०, २०१३ पर्यंतची सर्व सूचना/मार्गदर्शके एकत्रित पणे परिशिष्टामध्ये दिलेली आहेत.

आपला

(ए.के. बेरा)
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक
सहः वरील प्रमाणे

नागरी बँका विभाग, केंद्रीय कार्यालय, गारमेंट हाउस, १ला मजला, वरली, मुंबई-४०००१८,
फोनः ०२२ - २४९३ ९९३० - ४९, फॅक्सः ०२२ - २४९७ ४०३० / २४९२ ०२३१, ईमेलः rbiubdco@rbi.org.in

**अनुक्रमणिका**

**महापरिपत्रक - हमी, सहस्वीकार व पतपत्रे**


| | | |
|---|---|---|
| **१.** | **हमी** | पृष्ठ क्र. |
| १.१ | हमी देणे | ३ |
| १.१.१ | स्थूल मार्गदर्शक तत्वे | ३ |
| १.१.२ | उद्दिष्ट | ३ |
| १.१.३ | आकारमान | ३ |
| १.१.४ | परिपक्वता | ३ |
| १.१.५ | प्रतिभूतित हमी | ३ |
| १.१.६ | अप्रतिभूतित हमी | ४ |
| १.१.७ | डिफर्ड हमी | ४ |
| १.२ | सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखालील मालाबाबतच्या हमी | ४ |
| १.३ | हमी देण्यातील सावधानता | ४ |
| १.४ | बँक हमीखालील प्रदान - प्रकरणांची ताबडतोब तडजोड | ५ |
| १.५ | निवाड्यांच्या प्रमाणित प्रती मिळण्यामधील विलंब | ५ |
| १.६ | सरकारी विभागांशी पत्रव्यवहार | ६ |
| | | |
| **२.** | **बिलांचा सहस्वीकार** | **६** |
| २.१ | बिलांचा सहस्वीकार अनियमितता | ६ |
| २.२ | सुरक्षा/सावधानता | ६ |
| | | |
| **३.** | **पतपत्रे (एलसी)** | ७ |
| ३.१ | एलसी सुविधा देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे | ७ |
| ३.२ | सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल खाली असलेल्या मालबाबत एलसी देणे | ७ |
| ३.३ | एलसी उघडते वेळीच्या सावधानता | ७ |
| ३.४ | एलसींखाली प्रदान - दाव्यांची ताबडतोब तडजोड करणे | ८ |
| | | |
| **४.** | **अन्य सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे** | ९ |
| ४.१ | क्रेडिट एक्सपोझर नॉर्म्स आणि निधी आधारित नसलेल्या मर्यादांवरील वैधानिक/इतर निर्बंध | ९ |
| **परिशिष्ट** | | ११ |

# महापरिपत्रक
# हमी, सहस्वीकार आणि पतपत्रे

## १. हमी

### १.१ हमी देणे

#### १.१.१ स्थूल मार्गदर्शक तत्वे

हमी देण्याच्या व्यवसायामध्ये असलेल्या जोखमींचा विचार करता, प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांनी (पीसीबी), त्यांची आर्थिक परिस्थिती बिघडू नये ह्यासाठी निर्बंधित मर्यादांमध्ये हमी द्याव्यात. पुढील परिच्छेदांमध्ये दिल्यानुसार बँकांनी, त्यांच्या हमी व्यवसायाबाबतच्या स्थूल मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.

#### १.१.२ उद्दिष्ट

(i) सर्वसाधारण नियम म्हणून, बँकांनी केवळ वित्तीय हमी द्यावयात कामगिरीबाबतच्या नव्हेत.

(ii) तथापि, अनुसूचित बँका त्यांच्या ग्राहकांच्या वतीने कामगिरी बाबतच्या हमी, योग्य ती सावधानता घेऊन देऊ शकतात.

#### १.१.३ परिपक्वता

पीसीबींनी, लघुमुदतीच्या परिपक्वता ठेवणे त्यांच्यासाठी हितावह आहे. कोणत्याही बाबतीत, दहा वर्षांपेक्षा अधिक काळासाठी हमी दिल्या जाऊ नयेत.

#### १.१.४ आकारमान

कोणत्याही वेळी आउटस्टँडिंग असलेल्या हमींचे आकारमान, बँकेचे भरणा झालेले भांडवल राखीव निधी व ठेवी मिळून झालेल्या तिच्या एकूण निजस्त्रोतांच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. सर्वसमावेशक मर्यादेमध्ये, कोणत्याही वेळी आउटस्टँडिंग असलेल्या अप्रतिभूतित हमींचे प्रमाण, त्या बँकेच्या निजनिधीच्या (भरणा भांडवल + राखीव निधी) २५% रकमेपेक्षा अधिक किंवा हमींच्या एकूण रकमेच्या २५% ह्यापैकी जे कमी असेल त्यापेक्षा कमी असू नये.

#### १.१.५ प्रतिभूतित हमी

बँकांनी शक्यतो प्रतिभूतित हमी द्याव्यात प्रतिभूतित म्हणजे, त्या हमीच्या दायित्वाबाबतच्या रकमेपेक्षा जिचे बाजारमूल्य कोणत्याही वेळी कमी असणार नाही अशा मालमत्तेवर (कॅशमार्जिनसह) दिलेली हमी किंवा केंद्र सरकार, किंवा राज्यसरकार किंवा सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्था किंवा विमा कंपन्या किंवा इतर बँका ह्यांच्या प्रतिहमीचे संरक्षण मिळालेली हमी सर्वसाधारणतः बँकांनी, सुयोग्य मूर्त प्रतिभूतींच्या आधारावर डिफर्ड हमी द्याव्यात किंवा केंद्र सरकार, किंवा राज्यसरकार किंवा सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्था / विमा कंपन्या किंवा इतर बँका ह्यांच्या प्रतिहमीचे संरक्षण मिळालेली हमी द्याव्यात.

१.१.६ **अप्रतिभूतित हमी**

ग्राहक आणि/किंवा व्यापाराच्या विशिष्ट गटांना अप्रतिभूतित हमी देणे बँकांनी टाळावे बँकांच्या संचालक मंडळांनी, कोणत्याही वैय्यक्तिक ग्राहकाच्या वतीने अप्रतिभूतित हमी देण्याबाबत सुयोग्य प्रमाण ठरवावे. त्यामुळे अशा हमी पुढील बाबींची मर्यादा ओलांडणार नाहीत -

(अ) अशा सर्व ग्राहकांना, कोणत्याही वेळी, बँकेने दिलेल्या अप्रतिभूतित हमीच्या एकूण दायित्वाचा वाजवी भाग, आणि

(ब) बँकेमधील शेअर धारणाची वाजवी पट.

१.१.७ **डिफर्ड हमी**

(i) भांडवली मालमत्ता मिळविण्यासाठी त्यांच्या ग्राहकांना डिफर्ड प्रदान हमी देऊ इच्छिणाऱ्या बँकांनी खात्री करुन ध्यावी की, प्रायोजित डिफर्ड प्रदान हमीसह एकूण कर्जसुविधा विहित केलेल्या जोखीम मर्यादेबाहेर जात नाहीत.

(ii) देय असलेल्या हप्त्यांबाबत नियमित कालावधीने बँकेला तिची जबाबदारी पूर्ण करावयाची असल्याने, कर्ज मागणारे एकक पुरेसे अतिरिक्त पैसे निर्माण करत आहे. ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, बँकेने प्रकल्पाची लाभदायकता/कॅश फ्लोबाबत डिफर्ड पेमेंट हमीच्या प्रस्तावांची तपासणी करावी. अशा हमी देतेवेळी, एखादे मुदत कर्ज देताना लावावयाचे निकष, भांडवली मालमत्ता घेण्यासाठी मुदत कर्ज घेण्याबाबतही लावले जावेत.

१.२ **सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोलखालील मालाबाबतच्या हमी**

पीसीबीनी, एखाद्या कोर्टाला किंवा सरकाराला किंवा कोणत्याही व्यक्तीला आवश्यक मालाच्या आयातीसाठी सीमाशुल्क आणि/किंवा आयात शुल्क किंवा अन्य करांबाबतचे प्रदान करण्याबाबत कोणत्याही आयातदाराला किंव त्याच्या वतीने, अशा हमी देण्यासाठी, त्या हमी खाली देय असलेल्या किमान अर्ध्या रकमेएवढे कॅश मार्जिनची प्रतिभूती घेतल्याशिवाय कोणतीही हमी देऊ नये. 'आवश्यक माल' चा अर्थ म्हणजे, रिझर्व बँकेने वेळोवेळी विहित केलेला माल किंवा वस्तु

१.३ **हमी देण्यातील सावधानता**

वित्तीय हमी देताना बँकांनी पुढील सावधानता ठेवाव्यातः

(i) खोट्या हमी दिल्या जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी, बँक हमी, सलग अनुक्रमांकित सिक्युरिटी फॉर्म्सवर दिल्या जाव्यात.

(ii) बँकेने ठरविलेल्या एखाद्या विशिष्ट कट-ऑफ बिंदुवरील हमींवर, बँकेच्या दोन अधिकाऱ्यांच्या सह्या घेऊन त्या तीन प्रतींमध्ये दिल्या जाव्यात. एक-एक प्रत शाखा, लाभार्थी व नियंत्रक कार्यालय/मुख्य कार्यालयासाठी, नियंत्रक कार्यालय/मुख्य कार्यालयांचा ह्याबाबत दुजोरा घेणे लाभार्थीवर बंधनकारक असावे आणि तशी अट हमीमध्येही असावी.

(iii) बँकेकडून कर्ज सुविधेचा लाभ न घेणाऱ्या परंतु केवळ चालु खाते ठेवणाऱ्या ग्राहकांना सर्वसाधारणतः हमी देऊ नयेत. अशा ग्राहकांकडून विनंती केली गेल्यास, बँकांनी त्या प्रस्तावाची छाननी करावी आणि ग्राहकाच्या खऱ्या असलेल्या गरजेबाबत खात्री करुन घ्यावी. अशी हमी मिळाल्यानंतर, ग्राहक ती पूर्ण करण्यास समर्थ असतील आणि ह्याबाबत बँकेकडे कर्ज सुविधा मागणार नाहीत, ह्याबाबत बँकांचे समाधान झाले असावे. ह्यासाठी बँकांनी त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत ह्यांची चौकशी करुन एक सुयोग्य मार्जिन ठरवून आवश्यक वाटल्यास इतर प्रतिभूती घ्यावी. त्यांच्या आर्थिक दर्जाबाबत समाधान करुन घेण्यासाठी, बँका अशा ग्राहकांची सविस्तर वित्तीय विवरणपत्रे आणि संपत्तीकर/आयकर अहवालही मागू शकतात. ह्या सर्व मुद्द्यांवरील निरीक्षणे बँकांनी त्यांच्या लेखा पुस्तकात नोंदवून ठेवावीत.

(iv) जेथे ग्राहकांनी अन्य बँकांकडून कर्जसुविधा घेतल्या आहेत तेथे अशा हमी देण्याबाबत येण्यासंबंधीची कारणे जाणून - पडताळून घेतली जावीत आणि ज्या अन्य बँकांकडून कर्ज सुविधा घेतल्या आहेत, त्या बँकांकडून न चूकता संदर्भ घेण्यात यावा.

(v) दुसऱ्या एका बँकेकडून कर्ज सुविधा मिळविण्याबाबत अन्य बँकांच्या लाभार्थ हमी देण्याबाबत विनंती आल्यास, बँकांनी, अशा कर्ज सुविधा मिळविण्यासाठी दुसऱ्याच बँकेकडे जाण्याबाबतची कारणे संपूर्णतया तपासून घ्यावीत आणि असे करण्याचा गरजे बाबत समाधान करुन घ्यावे. हे देखील बँकेच्या पुस्तकात नोंदावे.

अशा हमी देणे आवश्यक असल्याचे वाटल्यास संबंधित बँकेने खात्री करुन घ्यावी की, ठरविलेल्या एका रकमेपलिकडील संबंधित हमीच्या कागदपत्रावर, योग्य ती मंजुरी व अधिकार घेऊन, केवळ एकाच नव्हे तर दोन अधिकाऱ्यांच्या सह्या संयुक्तपणे असाव्यात आणि अशा दिलेल्या हमीचे योग्य ते रेकॉर्ड ठेवले जावे. धनको बँकेने अशा कर्ज प्रस्तावांची छाननी करुन खात्री करुन घ्यावीकी असे प्रस्ताव विहित केलेले निकष व मार्गदर्शक तत्वांनुसार आहेत आणि त्या प्रस्तावाच्या गुणविशेषांनुसारच बँकेचे समाधान झाले असल्यासच कर्जसुविधा देण्याची परवानगी दिलेली आहे. तसेच दुसऱ्या एखाद्या बँकेच्या हमीची उपलब्धता, त्या प्रस्तावाचे मूल्यमापन व आर्थिक शिस्त बिघडविणारी ठरणार नाही.

### १.४ **बँक हमीखालील प्रदान - प्रकरणांची तावडतोब तडजोड**

(i) बँक हमींचे आवाहन केल्यानंतर परतफेड न केली जाणे किंवा विलंब केला जाण्याबाबतच्या तक्रारी भारत सरकार व भारतीय रिझर्व बँकेकडे येत आहेत.

(ii) आवाहित केलेल्या हमी संबंधीचे त्यांचे दायित्व पूर्व करण्यामधील बँकांची नाखुषी ही, अशा हमींमधील त्यांच्या ग्राहकांकडून येणे असलेल्या रकमेची वसुली न होण्यामुळे असू शकते. लाभादायकता वाढविण्याबाबतच्या त्यांच्या काळजीमुळे बँका, हमीच्या प्रस्तावांची योग्य ती छाननी न करता आणि अशा आवाहित केल्यावर त्यांची रक्कम बँकांना परत देण्याबाबतच्या कर्जक्षमतेचे योग्य मूल्यमापन न करता चाकोरीबाहेर जाऊन अशा हमी देतात प्रतिभूतीमधील ढिलाई (योग्य मार्जिन न घेणे) हे देखील, आवाहित हमींची रक्कम ग्राहकांकडून न मिळण्यामागील एक कारण असू शकते..

(iii) हमी आवाहित केल्यावर लाभार्थीना प्रदान करण्यासाठी वरील मुद्दे बँकांना मना करु शकतात आणि त्या आवाहित हमींबाबत डोळे विस्फारण्याजोगी कारवाई करण्यास बँकांना प्रवृत्त करु शकतात. त्यामुळे, निधी आधारित मर्यादांप्रमाणेच, हमींच्या प्रस्तावांचे मूल्यमापन केले जाणे आणि आवाहित हमींचे बँकांनी प्रदान करतेवेळी प्रदानामध्ये कसुरी करण्याची प्रवृत्ती ग्राहकांमध्ये निर्माण होऊ नये ह्यासाठी मार्जिनच्या रुपात सुयोग्य संरक्षण घेतले जावे.

(iv) हमी देण्याऱ्या बँकेने बँक हमी देणे हे लाभार्थीला प्रदान करण्याबाबतचे वचन/दायित्व आहे (बँक ग्राहकाच्या वतीने असली तरी) त्यावर केलेला हक्क पाळण्यात बँकेचे अपयश हे ती यंत्रणा नीट काम करत नसल्याचे दर्शविते.

(v) भूतकाळात काही कोर्टांनी, हमीबाबतची वचने तातडीने पूर्ण न केल्याबाबत बँकांविरुध्द काही शेरे दिले आहेत. ह्या संदर्भात, काही पक्षांनी कोर्टात जाऊन आवाहित हमींचे प्रदान थांबविण्याबाबतचा, माननीय सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सोबत जोडला आहेः

> ‘ह्यासाठी आमचे असे मत आहे की, कायद्यानुसार, कोर्टाचा कोणताही हस्तक्षेप न केला जाताही बँकांनी त्यांचे दायित्व पूर्ण करावे. आणि केवळ अपवादात्मक प्रकरणातच - म्हणजे, लबाडी, फसवणुक, किंवा भरून न येणारा अन्यायाच्या प्रकरणांमध्ये, बँक हमीचे रोखीकरण करण्यास परवानगी दिली गेली असल्यासच कोर्टाने हस्तक्षेप करावा’

(vi) ह्यासाठी प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांनी, हमी आवाहित केल्याबरोबर, त्यांनी दिलेल्या हमींचे दायित्व पूर्ण करावे, कारण आवाहित हमींचा मान राखण्यातील चालढकलीमुळे बँकिंग प्रणाली बदनाम होण्याचा संभव आहे.

### १.५ **निवाड्यांच्या प्रमाणित प्रती मिळण्यामधील विलंब**

(i) वित्त मंत्रालयाने कळविले आहे की, राजस्व विभागासारख्या काही विभागांना, त्यांच्या बाजूने दिल्या गेलेल्या, निरनिराळ्या कोर्टांच्या निर्णयांची अंमलबजावणी करणे कठीण होत आहे कारण बँकांना अशा निर्णयांच्या प्रमाणित प्रती मिळाल्याशिवाय त्या बँका त्यांच्या हमींचा मान राखत नाहीत.

(ii) ह्या अडचणीं विचारात घेता बँका पुढील कार्यरीतीचे अनुसरण करु शकतात :

(अ) जेथे बँक हमीची अंमलबजावणी करण्यासाठी, सरकारने केलेल्या कारवाईसाठी, ती बँक हा एक पक्ष आहे आणि कोर्टाने सरकारच्या बाजूने निर्णय दिला आहे तेथे, तो निर्णय खुल्या कोर्टात, पक्ष/त्यांचे वकील ह्यांच्या उपस्थितीत दिला गेला असल्याने, बँकेने त्या निर्णयाच्या प्रमाणित प्रतीसाठी आग्रह धरु नये.

(ब) एखादी बँक त्या प्रकरणामधील एक पक्ष नसल्यास, हमीदाराने बँकेने उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द अपील सादर करावयाचे ठरविले नसल्यास, त्या हमींखालील दायित्वे पूर्ण करण्यासाठी, उच्च न्यायालयचा निबंधक/दुय्यम निबंधक ह्यांनी प्रमाणित केलेली, व सरकारी वकीलांनी सत्य प्रत म्हणून सत्यांकन केलेली, त्या आदेशाचे इतिवृत्ताची सही केलेली प्रतही पुरेशी असावी.

### १.६ सरकारी विभागांशी पत्रव्यवहार

(i) भारतीय संविधानानुसार, भारतीय संघराज्याशी संबंधित असलेली सर्व कृती/कारवाई ही भारताच्या राष्ट्रपतींच्या नावे असेल व असल्याचे सांगण्यात येईल तथापि, भारत सरकारचा व्यवहार हा अनेक मंत्रालये/विभागांच्या मार्फत केला जातो आणि हमीसारख्या कागदपत्रांमधून भारताच्या राष्ट्रपतींचा एक पक्ष म्हणून निदेश केला जात असला तरी भारताच्या राष्ट्रपतींशी पत्रव्यवहार केला जाऊ नये तर तो संबंधित सरकारी मंत्रालये/ विभागांशी केला जावा.

(ii) ह्यासाठी बँकांनी खात्री करुन घ्यावी की, बँकांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या नावे, सरकारी विभागांच्या बाजूने दिलेल्या हमीसंबंधीचा पत्रव्यवहार, राष्ट्रपतींच्या पत्त्यावर करु नये, त्यामुळे राष्ट्रपती- सचिवालयाला असुविधा होईल.

## २. बिलांचा सहस्वीकार

### २.१ बिलांच्या सहस्वीकारामधील अनियमितता

(i) बँका त्यांच्या ग्राहकाच्या बिलांचा सहस्वीकार करत आल्या आहेत अनेकदा अशी बिले ही सह-संस्थांच्या गटांनी एकमेकांवर काढलेली अकोमोडेशन बिलेच असतात आणि कोणताही वास्तव व्यवहार त्यात झालेला नसतो. अशी बिले त्यांच्या परिपक्वतेनंतर ती काढणारे भरत नाहीत आणि त्यांचा सहस्वीकार करणाऱ्या बँकांना त्या बिलांचे प्रदान करावे लगते आणि त्यानंतर त्या रकमेची वसुली, बिले काढणारांकडून/देणारांकडून करणे कठीण होऊन बसते. ह्याचे कारण म्हणजे, सहस्वीकार करणाऱ्या बँकांद्वारे, गरजेच्या वेळी त्या पक्षांद्वारे, त्या बिलांचा मान राखण्याबाबतची क्षमता तसेच आर्थिक स्थितीचा विचार बँकांनी केला नसतो.

(ii) अशीही काही प्रकरणे झाली आहेत की, बिलांच्या सहस्वीकाराबाबतचा तपशील बँकेच्या पुस्तकात नोंदविलाच गेला नाही व परिणामी, तपासणीदरम्यान सहस्वीकाराचे आकारमान तपासून पाहता येत नाही आणि डिस्काउंट करणाऱ्या बँकेकडून दावा सादर केल्यावरच मुख्य कार्यालयात त्या सहस्वीकाराची जाणीव होते.

### २.२ सुरक्षा/सावधानता

वरील बाबी विचारात घेता, बँकांनी पुढील सुरक्षा विचारात घ्याव्यात :-

त्यांच्या ग्राहकांच्या सहस्वीकार मर्यादा मंजुर करताना, तशी गरज असल्याचे पडताळून पहावे आणि बँकांमधील इतर मर्यादांचा ६

(i) उपभोग घेणाऱ्या ग्राहकांनाच अशा मर्यादा दिल्या जाव्यात.

(ii) केवळ खऱ्या/सत्य व्यापारी बिलांचाच सहस्वीकार केला जावा आणि सहस्वीकार केलेल्या अशा बिलांखालील माल कर्जदाराच्या स्टॉक खात्यात जमा झाला असल्याची खात्री करुन घ्यावी.

(iii) मालसाठ्याचे मूल्य फुगविण्यात आलेले नाही ह्याची खात्री करण्यासाठी, सोबतच्या इनव्हॉईसमध्ये निर्देशित केलेल्या मालाचे मूल्यही पडताळून पाहिले जावे

(iv) कंपनी गटांनी, त्यातील कंपन्यांनी एकमेकीवर काढलेल्या हाउस बिले/अकोमडेशन बिलांसाठी सहस्वीकार दिला जाऊ नये.

(v) एका ठराविक मर्यादापलिकडे बिलांचा सहस्वीकार करावयाचे अधिकार दोन अधिकाऱ्यांना संयुक्तपणे दिले जावेत.

(vi) प्रत्येक ग्राहकांबाबत सहस्वीकार केलेल्या बिलांचे योग्य रेकॉर्ड ठेवले जावे त्यामुळे प्रत्येक ग्राहकाबाबतचे दायित्व तसेच शाखेवरील एकूण दायित्व लगेच पाहता येईल आणि त्याची तपासणी अंतर्गत तपासनीसांद्वारे केली जाऊन त्याबाबत त्यांच्या रिपोर्टात शेरे दिले जावेत.

(vii) सुयोग्य असे नियतकालिक अहवाल विहित केले जावेत. त्यामुळे, अशा सहस्वीकारांची दायित्वे शाखानिबंधक मुख्य कार्यालयाला कळवू शकतील अशा अहवालांमध्ये, सहस्वीकारांचे दायित्व पूर्ण करण्यासाठी त्या बँकेने भरलेल्या मुदतबाह्य बिलांची स्थितीही समाविष्ट केली जावी. ह्यामुळे, शाखांनी दिलेल्या सहस्वीकारांवर देखरेख ठेवून, अडचणीच्या प्रकरणांमध्ये योग्य ती कारवाई करता येईल.

## ३. पतपत्रे (एलसी)

### ३.१ एलसी सुविधा देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

सर्वसाधारणतः नाममात्र खाती ठेवणाऱ्या पक्षांच्या बाबतीत, प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांनी, एलसी सुविधा देऊ नयेत. केवळ चालु खाती ठेवणाऱ्या व एलसी सुविधा मागणाऱ्या ग्राहकांच्या बाबतीत बँकांनी, त्या कर्जदारांच्या विद्यमान बँकर्सकडे चौकशी करुन, त्या बँका एलसी सुविधा न देण्याची कारणे विचारावीत. ते ग्राहक, ज्या बँकर्सकडून मुख्य मर्यादांचा लाभ घेत आहेत त्यांच्या बाबतीत या ग्राहकांच्या पूर्वकामगिरीबाबत चौकशी करुन, त्यांची आर्थिक स्थिती व बिलांची परतफेड करण्याची क्षमता जाणून अशा पक्षांसाठी पतपत्रे उघडावीत. त्यांनी ह्याबाबत सुयोग्य मार्जिने विहित करुन जरुर असेल त्याप्रमाणे अन्य प्रतिभूतीही घ्यावी.

### ३.२ सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल खाली असलेल्या मालाबाबत एलसी देणे

आवश्यक वस्तूंच्या आयातीसाठी एलसी उघडण्याबाबत बँकांवर कोणतेही निर्बंध नाहीत. तथापि, त्या एलसीखाली युजन्स बिलांचे डिस्काउंटिंग करण्यास इतर बँकांना मदत होईल अशा प्रकारचा खंड असलेली इनलँड एलसी उघडण्यास बँकांना परवानगी नाही.

### ३.३ एलसी उघडतेवेळीच्या सावधानता

एलसी उघडण्यापूर्वी बँकांनी पुढील गोष्टींची खात्री करुन घ्यावीः

(i) एलसी केवळ सिक्युरिटी फॉर्मवरच दिल्या जाव्यात.

(ii) मोठ्या रकमेच्या एलसी, दोन प्राधिकृत व्यक्तींच्या सह्यांनी दिल्या जाव्यात व त्यातील त्यातील एक सही मुख्य कार्यालय/नियंत्रक कार्यालयातील असावी. कुरियर सेवा, स्पीड पोस्ट इत्यादी उपलब्ध असल्याने मोठ्या एलसीची गरज एकाएकी निर्माण झाल्यास वरील कार्यरीतीमुळे विलंब होणार नाही. ह्या एलसीमध्येच एक स्तंभ ठेवला जावा व त्यात ती मंजुर करणारे प्राधिकरण व त्याबाबतचा तपशील दिला जावा;

(iii) कर्जदाराच्या खऱ्या गरजेपेक्षा जास्त/अवाजवी रकमांसाठी एलसी दिल्या जात नाहीत. आणि त्याबाबतच्या बिलांचे प्रदान करण्यासाठी कर्जदारांनी योग्य ती व्यवस्था त्यांच्या स्वतःच्या स्त्रोतांमधून किंवा विद्यमान कर्ज व्यवस्थामधून केली असल्याची खात्री केल्यावरच अशा एलसी उघडल्या जाव्यात.

(iv) कच्चामाल खरेदी करण्यास एलसी उघडल्या असल्यास, कर्जदारांनी कच्च्या मालाचा अवाजवी जास्त साठा, (मापदंड/मागील अनुभवांचा विचार करुन) केला नसावा. अशा एलसी डी/ए धर्तीवर उघडावयाच्या असल्यास, कॅश क्रेडिट खात्यातील निकासीक्षमता ठरविण्यासाठी, संबंधित खरेदीवरील क्रेडिट विचारात घेतले जावे;

(v) बहुबँकीय धर्तीवरील व्यवस्था कर्जदारांबाबत, त्यापैकी प्रत्येक बँकेच्या संमत भागावर आधारित मर्यादेच्या आत एलसी उघडल्या जाव्यात. तथापि सभासद बँकांनी, मुख्य बँक/इतर बँकांना माहिती दिल्याशिवाय मंजुरीप्राप्त मर्यादांच्या बाहेर एलसी उघडू नय;

(vi) कर्जदाराला अर्थसहाय्य करण्यासाठी ठरलेली बहुबँकीय व्यवस्था नसल्यास, विद्यमान बँकेने किंवा एखाद्या नव्या बँकेने, इतर बँकांच्या माहितीशिवाय एलसी उघडू नये;

(vii) भांडवली माल मिळविण्यासाठी असलेल्या एलसी बँकानी, वित्त संस्था/बँकांकडून दीर्घ मुदतीचे निधी किंवा मुदतकर्जे देण्याच्या मार्गाने संबंधित दायित्व पूर्ण करण्यासाठी असलेल्या निधीची जोडणी झाली असल्याबाबतचे समाधान झाल्यावरच उघडव्यात;

(viii) कोणत्याही परिस्थितीत, भांडवली मालमत्ता मिळविण्या बाबतची बिले प्रदान करण्यासाठी, कार्यकारी भांडवल मर्यादा वापरण्यास परवानगी दिली जाऊ नये.

(ix) त्यांचे नियमित ग्राहक नसलेल्या पक्षांना, त्यांच्या उत्पादन - वित्त आवश्यकतांसाठी बँकांनी, निधी आधारित नसलेल्या/तात्पुरत्या सुविधा देऊ नयेत. तसेच, नियमित ग्राहक नसलेल्या लाभार्थींना, एलसीखाली किंवा अन्यथा काढलेली बिले डिस्काउंट करु नयेत, नियमित ग्राहक नसलेल्या पक्षाला अशी सुविधा देणे अपरिहार्य झाले असल्यास, बँकांनी, त्या कर्जदाराच्या विद्यमान बँकरचे मत घ्यावे आणि त्या कर्जदाराची पूर्वकामगिरी त्याची आर्थिक स्थिती आणि वेळेवर बिले भरण्याची क्षमता ह्याबाबत चौकशी करावी.

(x) मार्च ३०, २०१२ पासून, एखाद्या विशिष्ट युसीबीच्या च बाबत एलसीं खाली काढलेली बिले आणि त्या बिलाचा लाभार्थी हा, त्या युसीबी द्वारे नियमित कर्ज सुविधा देण्यात आलेला असा एक कर्जदार असल्यास, संबंधित युसीबी, ने एलसी देणाऱ्या बँकेच्या पत-क्षमतेबाबत असलेल्या तिच्या मतावर आधारित अशा एलसीं बाबत वाटाघाटी(निगोशिएट) करु शकते. मात्र त्या बाबतचे उत्पन्न हे, त्या एलसीच्या लाभार्थींच्या नियमित बँकर्स कडे प्रेषित केले जात असावे. तथापि, नियमित कर्ज सुविधा न मिळालेल्या कर्जदारांसाठी, अनिर्बंधित एलसींच्या वाटाघाटी (निगोशिएशन) बाबतची मनाई लागु असणे सुरुच राहील.

(xi) वरील प्रमाणे बिले निगोशिएट करणाऱ्या (निर्बंधित एलसींखाली) युसीबींना, कर्जदाराशी शेअर्स बाबतची जोडणी(शेअर लिंकिंग) आणि को ऑपरेटिव सोसायट्या अधिनियमच्या सभासदत्वा बाबतच्या तरतुदी ह्या बाबत, युसीबींना, रिझर्व बँक/आरसीएस किंवा सी आर सी ह्यांच्या सूचनांचे पालन करावे लागेल.

### ३.४ एलसींखाली प्रदान - दाव्यांची ताबडतोब तडजोड करणे

(i) बँकांच्या आधिकाऱ्यांनी अप्राधिकृत रितीने एलसी उघडण्याचे काही प्रसंग घडले आहेत. काही बाबतीत तर एलसी देणाऱ्या अधिकाऱ्यांनी, एलसीचे ते व्यवहार शाखेच्या पुस्तकात नोंदवूनही ठेवले नव्हते. इतर काही बाबतीत, दिलेल्या एलसींची रक्कम, त्या अधिकाऱ्यांना असलेल्या अधिकारापेक्षाही अधिक होती त्यामुळे बँकांना असे लबाडीचे व्यवहार कळून आल्यावर, हे व्यवहार, लाभार्थी व ग्राहक ह्यांचा लबाडीयुक्त संगनमताने केले असल्याचे कारण सांगून बँका त्यांचे दायित्व नाकारतात.

(ii) येथे नोंद घ्यावी की एलसीखाली काढलेल्या बिलांचा मान न राखल्यास, त्या एलसीच्या व प्रदानाचे स्वीकार्य साधन समजले गेलेल्या संबंधित बिलाच्या गुणावरच वाईट परिणाम होईल. ह्यामुळे बँकेमार्फत प्रदान करण्याच्या सर्व यंत्रणेच्या विश्वासार्हतेलाच धोका निर्माण होईल व बँकांचीही प्रतिमा मलीन होईल ह्यामुळे, सर्व बँकांनी त्यांची एलसीखालील दायित्वे पूर्ण करुन, ह्याबाबत कोणतीही तक्रार ठेवण्यास वाव न देता प्रदान करणे आवश्यक आहे. गुन्हेगारी कट नजरेस आल्यास, बँकांनी, संबंधित अधिकारी, ज्यांच्या वतीने एलसी उघडण्यात आल्या आहेत ते ग्राहक तसेच लाभार्थी ह्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करावी हे सांगणे नकोच.

## ४. अन्य सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे

### ४.१ क्रेडिट एक्सपोझर नॉर्म्स आणि निधी आधारित नसलेल्या मर्यादांवरील वैधानिक/इतर निर्बंध

(i) प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांनी, 'एक्सपोझर नॉर्म्स व वैधानिक/इतर निर्बंध' ह्यावरील महापरिपत्रकात दिलेल्या, निधी आधारित नसलेल्या मर्यादांसाठी (उदा. एलसी, हमी, सहस्वीकार इत्यादि) विहित केलेल्या, एक्सपोझर नॉर्म्स व वैधानिक/इतर निर्बंधांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

(ii) पुढील बाबीसाठी विहित केलेल्या जोखमी मर्यादा व निर्बंधांचे काटेकोर पालन केले पाहिजे –

अ) निधी आधारित नसलेल्या मर्यादांसह एकूण क्रेडिट एक्सपोझर

ब) अप्रतिभूतित हमी,

क) बँक संचालकांना दिलेल्या अग्रिम राशी

ड) संचालकांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे व अग्रिम राशी

ई) नाममात्र सभासदांना दिलेल्या अग्रिम राशी

४.२ ताळेबंदाबाहेरील व्यवहारांचा तपशील नोंद करण्यासाठी तयार केलेल्या प्रणालींचे अनुपालन सर्व शाखा करत आहेत ह्याची खात्री बँकांनी करुन घ्यावी. ह्या नोंदीचे नियतकालिक समतोलन केले जावे व अंतर्गत ऑडिटर्सनी ते तपासून शेरे द्यावेत.

४.३ अनधिकृत एलसी दिल्या जाणार नाहीत ह्याची बँकांनी खात्री करून घ्यावी.

४.४ बँकेच्या एलसीखाली असलेली बिले अंगावर पडल्यामुळे, किंवा बँकेने दिलेल्या हमीचे आवाहन केल्याने, अशा निधी आधारित नसलेल्या सुविधा निधी आधारित झाल्याने त्या कर्ज खात्याच्या बाबतीत, बँकांनी त्यांच्या शाखांच्या कर्मचाऱ्यांसाठी स्पष्ट सूचना तयार कराव्यात. निधी आधारित नसलेल्या सुविधा जेथे 'निधी आधारित' होतात अशा खात्यांवर जवळून देखरेख ठेवण्याची खात्री करण्यासाठी अंगावर पडलेल्या बिलांखालील माल बँकेच्या नियंत्रणाखाली/गहाणवटीखाली यावा ह्यासाठी, विशेषतः कुविचार/वाईट उद्देशाची शंका आल्यास, बँकांनी योग्य ती मार्गदर्शक तत्वे तयार करावीत. आयात एलसीखालील मालबाबत, बिल ऑफ एंट्रीची कस्टम्स प्रत ताबडतोब सादर केली जाईल ह्याची बँकांनी खात्री करुन घेऊन विदेशी मुद्रा विभागाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वात विहित केलेले उपाय योजावेत.

४.५ अनेक बँका, अंगावर पडलेल्या एलसींची व आवाहित हमींची थकित रक्कम एका निराळ्याच खात्यात टाकतात. ही नियमित मंजुरीप्राप्त सुविधा नव्हे. त्यामुळे, ह्या बाबी कर्जदाराच्या मुख्य खात्यात दिसून येत नाहीत. त्यामुळे एनपीए ठरविण्यामधील प्रुडेंशियल नॉर्म्स लागु करण्यात अडचण येते. ह्यासाठी सांगण्यात येते की, अंगावर पडलेल्या एलसी किंवा आवाहित हमी ह्यामुळे निर्माण झालेली कर्जे एका वेगळ्या खात्यात टाकल्यास, इनकम रेकग्निशन, ॲसेट वर्गीकरण व तरतुदीकरण ह्यासाठी प्रुडेंशियल नॉर्म्स लागु करण्यासाठी, त्या खात्यात असलेली शिल्लक ही देखील त्या कर्जदाराच्या मुख्य कार्यकारी खात्याचा एक भाग समजली जावी.

४.६ बँकांनी, कर्जसुविधा घेणाऱ्या ग्राहकांबाबतची माहिती वाढविण्यास, त्या कर्जदारांनी इतर बँकांकडून घेतलेल्या कर्जसुविधांबाबत एक घोषणापत्र घ्यावे. विद्यमान धनकोंच्या बाबतीत, रु ५.० कोटींच्या वर मंजुर कर्जसुविधा घेतल्या असलेल्या किंवा त्यांच्या माहितीप्रमाणे इतर बँकांकडून कर्ज सुविधा घेतली असलेल्या त्यांच्या विद्यमान कर्जदारांकडून एक घोषणापत्र घ्यावे आणि इतर बँकांकडून माहितीची अदलाबदल करण्याची प्रणाली तयार करावी. त्यांनंतरही, त्यांच्या कर्जदारांच्या खात्यांच्या वर्तणुकीबाबतच्या माहितीची, इतर बँकांबरोबर, नियतकालिकेने, म्हणजे दर तीन महिन्यांनी, देवाणघेवाण करावी. बँकांनी, क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्याकडून मिळणाऱ्या अहवालांचाही उपयोग करावा. गोपनीयतेचे प्रश्न

सोडविण्यासाठी, बँकांनी त्यांच्या कर्जकरारनाम्यात, इतर बँकांकडील माहितीच्या देवाण - घेवाणबाबतचा मुद्दाही समाविष्ट करावा. अस्तित्वात असलेल्या निरनिराळ्या वैधानिक बाबींचे पालन करण्याबाबत, व्यवसायिकांकडून, विशेषतः कंपनी सेक्रेटरी, चार्टर्ड अकाउंटंट किंवा कॉस्ट अकाउंटंटकडून नियमित प्रमाणपत्र घ्यावे. कर्जदारांकडून घ्यावयाची माहिती, बँकांमधील माहितीची देवाणघेवाण, आणि व्यवसायिकाद्वारे करावयाचे प्रमाणन ह्यांचे नमुने, परिपत्रक युबीडी.पीसीबी.क्र.३६/ १३.०५.०००/२००८-०९ दिनांक जानेवारी २१, २००९ सह वाचित आमचे परिपत्रक युबीडी.पीसीबी.क्र.५९/१३.०५.०००/२००८-०९ दिनांक एप्रिल ९, २००९ मध्ये दिले आहेत.

४.७ हमी, सहस्वीकार, एलसी इत्यादी स्वरुपाच्या दायित्वांसह बँकांना त्यांच्या व्यवहारांमध्ये निरनिराळ्या जोखमीना सामोरे जावे. लागते. युसीबींच्या व्यवस्थापनांना, त्यांचे ठेवीदार व ग्राहक ह्यांचे हित नजरेसमोर ठेवूनच, सुदृढ जोखीम व्यवस्थापनावर आधारित व्यवहार निर्णय घ्यावे लागतात. ह्यासाठी, तरलता, व्याजदर व चलन जोखीम ह्याबाबतचे प्रश्न सोडविण्यासाठी, युसीबींनी परिणामकारक ॲसेट लायबिलिटी मॅनेजमेंट (एएलएम) चा अवलंव करणे आवश्यक आहे. ह्याबात रिझर्व बँकेने दिलेल्या एएलएमच्या मार्गदर्शक तत्वांचे अनुसरण केले जावे.

---

**परिशिष्ट**

## अ. महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकाची यादी

| क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | युबीडी.(पीसीबी)बीपीडी.परिपत्रक क्र.२९/१३/०५.०००/२०११-१२ | ३०-०३-२०१२ | युसीबीं व्दारे बिलांचे डिस्काउंटिंग - निर्बंधित पतपत्रे |
| २. | युबीडी .बीएसडी-आय/८/१२.०५.००/२०००-२००१ | ०९-११-२००० | लबाडी - प्रतिबंधक उपाय |
| ३. | युबीडी .क्र.प्लॅन.पीसीबी.सीआयआर०७/०९.२७.००/ ९९-२००० | २१-०९-१९९९ | बँक हमी |
| ४. | युबीडी .क्र.प्लॅन.(पीसीबी)४९/०९.२७.००/९६-९७ | २६-०४-१९९७ | बँक हमीखाली प्रदान - प्रकरणांची त्वरित तडजोड |
| ५. | युबीडी.क्र.डीएस.(पीसीबी)एीआयआर.४/१३.०३.००/९६-९७ | १६-०७-१९९६ | सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल - संवेदनशील मालाविरुध्द अग्रिम राशी |
| ६. | युबीडी .क्र.आयअँडएल/पीसीबी/९/१२.०५.००/९५-९६ | ०१-०९-१९९५ | बँक हमीखाली प्रदान - प्रकरणांची त्वरित तडजोड |
| ७. | युबीडी.प्लॅन.सीआयआर.एसयुबी.१/०९.२७.००/९४-९५ | १८-१०-१९९४ | हमी देणे - प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांनी अनुसरावयाची मार्गदर्शक तत्वे |
| ८. | युबीडी.क्र.डीएस.सीआयआर.पीसीबी१५/१३.०३.००/९४-९५ | १५-०९-१९९४ | सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल - आयात केलेली साखर |
| ९. | युबीडी.क्र.(पीसीबी)सीआयआर.७९/१३.०३.००/९३-९४ | २६-०५-१९९४ | सिलेक्टिव क्रेडिट कंट्रोल - आयात केलेली साखर |
| १०. | युबीडी .क्र.प्लॅन.४२/०९.२७.००-९३/९४ | १६-१२-१९९३ | बँक हमी - निवड्यांच्या प्रमाणित प्रती मिळण्यातील विलंब |
| ११. | युबीडी .क्र.पीओटी.१/युबी.५८-९२/३ | ०३-०७-१९९२ | एलसींखाली प्रदान - प्रकरणांची त्वरित तडजोड |
| १२. | युबीडी .पी अँड ओ .७६३/युबी.५८-८३/८४ | २८-०२-१९८४ | हमी देणे - नागरी सहकारी बँकांव्दारे बिले इत्यादींचा सहस्वीकार |

**ब. इतर परिपत्रकांची यादी यात हमीबाबत सूचना, सहस्वीकार आणि एलसीज् यांचाही महापरिपत्रकात एकत्रित समावेश केलेला आहे.**

| क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | युबीडी.पीसीबी.क्र.५९/१३.०५.०००/२००८-०९ | ०९-०४-२००९ | एकत्रित आलेल्या बँकेच्या रचनेनुसार कर्ज/बहुबँकीय व्यवस्था |
| २. | युबीडी.पीसीबी.क्र.३६/१३.०५.०००/२००८-०९ | २१-०१-२००९ | एकत्रित आलेल्या बँकेच्या रचनेनुसार कर्ज/बहुबँकीय व्यवस्था |
| ३ | युबीडी.पीसीबी.सीआयआर.१२अँड१३/१२.०५.००१/२००८-०९ | १७-०९-२००८ | एएलएम मार्गदर्शके |
| ४. | युबीडी .बीएसडी.क्र.आयपी.३०/१२.०५.०५/२००२-०३ | २६-१२-२००२ | महापरिपत्रकात - प्रुडेंशियल नॉर्म्स - मिळकत ओळख ॲसेट वर्गीकरण, प्रोविजनिंग आणि इतर संबंधित गोष्टी. |
| ५. | युबीडी.क्र.डीएस(पीसीबी).सीआयआर.५४/१३.०५.००/९४-९५ | २९-०४-१९९५ | अग्रिम राशीवरील कमाल मर्यादा |
| ६. | युबीडी .क्र.(पीसीबी)डीआयआर.५/१३-०५.००/९३-९४ | २६-०५-१९९४ | अग्रिम राशीवरील कमाल मर्यादा |
| ७. | युबीडी.क्र.डीएस(पीसीबी)सीआयआर.७६/१३.०५.००/९३-९४ | २६-०५-१९९४ | अग्रिम राशीवरील कमाल मर्यादा - संचालक आणि त्यांचे नातेवाईक आणि संचालक किंवा त्यांचे नातेवाईक ह्यांचे हितसंबंध असलेल्या संस्थांना देण्यात येणा-या अग्रिम राशी |
| ८. | युबीडी .२१/१२:१५:००/९३-९४ | २१-०९-१९९३ | बँकेतील प्राथमिक (अर्बन) नागरी सहकारी बँकांमधील फसवणूकी आणि दुष्कृत्ये यांच्या विविध पैलुबद्दल चौकशी - करण्यासाठीची समिती |
| ९. | युबीडी .(डीसी).१०४/आर.१-८६/८७ | २५-०६-१९८७ | कार्यकारी भांडवलाच्या आवश्यकतांचे मूल्यमापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे एलसी उघडणे व हमी देणे. |